जनसंपर्क कक्ष
27 FEB 2024 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# यकृताच्या कर्करोगावरील संशोधनासाठी शिवाजी विद्यापीठास पेटंट

## डॉ. शंकर हांगिरगेकर यांचे अभिनव संशोधन

कोल्हापूर : यकृताच्या कर्करोगावरील उपचारप्रसंगी केवळ कर्करोगाच्याच पेशींना लक्ष्य करणाऱ्या अभिनव संशोधनासाठी शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातील संशोधकांना भारतीय पेटंट मिळाले आहे. डॉ. शंकर हांगिरगेकर यांच्यासह संशोधक विद्यार्थी डॉ. रुतीकेश गुरव व अक्षय गुरव यांनी हे संशोधन केले.

सध्या जगभरात आणि भारतातही यकृत कर्करोगाच्या रूग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. त्यावरील उपचारासाठी सर्जरी, केमोथेरपी, रेडीओथेरपी, अँटीबॉडीज अशा उपचार पद्धती विकसित करण्यात आल्या. परंतु



डॉ. शंकर हांगिरगेकर



डॉ. रुतीकेश गुरव



अक्षय गुरव

यामध्ये रूग्णाला दुष्परिणामांना सामोरे जावे लागते.

कर्करोगावरील केमोथेरपी उपचारांमध्ये काही औषधांचा उपयोग केला जातो, परंतु या औषधांचा इतर सामान्य पेशींवरही दुष्परिणाम होतो. या पार्श्वभूमीवर, शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्र अधिविभागातील संशोधक डॉ. हांगिरगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. रुतीकेश गुरव आणि अक्षय गुरव यांनी बारा नवीन 'डायहैड्रोपिरिमिडोन्स' सेंद्रिय संयुगे प्रयोगशाळेमध्ये तयार केली. त्यांची चाचणी 'एच.इ.पी. जी.-२' या यकृताच्या कर्करोगाला कारणीभूत असणाऱ्या पेशींवर केली. या संशोधनास भारतीय पेटंट प्राप्त झाले आहे.

### उपचारासाठी सुरक्षित संयुगे

या संशोधनाबाबत डॉ. हांगिरगेकर म्हणाले, यकृताच्या कर्करोगावर इतर सर्वसामान्य पेशींना कोणताही अपाय न करता केवळ कर्करोगाच्याच पेशींना लक्ष्य करणाऱ्या 'डायहैड्रोपिरिमिडोन्स' या सेंद्रिय संयुगांची निर्मिती करण्यात यश आले आहे. या संयुगाच्या चाचणीत आढळून आले की, ही संयुगे कर्करोगाच्या पेशींना पूर्णपणे नष्ट करतात. ते करताना शरीरातील इतर सामान्य पेशींना अपाय करत नाहीत. त्यामुळे ही संयुगे उपचारांसाठी सुरक्षित आहेत.

### दर्जेदार संशोधनावर पुनश्च शिक्कामोर्तब

विद्यापीठाच्या गुणवत्तापूर्ण संशोधनावर पुनश्च शिक्कामोर्तब झाले आहे. यापूर्वी या विभागातील डॉ. गजानन राशिनकर यांनीही स्तनांच्या कर्करोगावरील उपचाराच्या अनुषंगाने केलेल्या संशोधनासही पेटंट मिळाले आहे. या संशोधनासाठी डॉ. हांगिरगेकर आणि त्यांचे संशोधक विद्यार्थी यांचे अभिनंदन, अशी प्रतिक्रिया कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी व्यक्त केली.

पुढारी
27 FEB 2024
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# यकृताच्या कर्करोगावरील संशोधनासाठी विद्यापीठास पेटंट

## डॉ. शंकर हांगिरगेकर यांचे कर्करोगास कारणीभूत पेशींवर अभिनव संशोधन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

यकृताच्या कर्करोगावरील उपचारप्रसंगी केवळ कर्करोगाच्या पेशींना लक्ष्य करणाऱ्या अभिनव संशोधनासाठी शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातील संशोधकांना भारतीय पेटंट मिळाले आहे. याबाबत डॉ. शंकर हांगिरगेकर यांच्यासह संशोधक विद्यार्थी डॉ. रुतीकेश गुरव, अक्षय गुरव यांनी संशोधन केले.

सध्या जगभरात यकृत कर्करोगाच्या रुग्णांची संख्या वाढत आहे. जागतिक स्तरावर यकृताचा कर्करोग स्त्रियांपेक्षा पुरुषांमध्ये अधिक प्रमाणात आढळतो. यकृताच्या कर्करोगामुळे होणारा पुरुषांचा जागतिक मृत्युदर अधिक आहे. हा जटिल आजार आहे. आतापर्यंत या रोगाच्या उपचारासाठी सर्जरी, केमोथेरपी, रेडिओथेरपी, अँटिबॉडीज अशा विविध प्रकारच्या उपचार पद्धती विकसित करण्यात आल्या; परंतु उपचारादरम्यानच्या दुष्परिणामांना रुग्णाला सामोरे जावे लागते.

कर्करोगावरील केमोथेरपी उपचारांमध्ये काही औषधांचा उपयोग केला जातो; परंतु या औषधांचा इतर सामान्य पेशींवरही दुष्परिणाम होतो. सध्या वापरात असलेली कर्करोगावरील औषधे कर्करोगाच्या पेशी व इतर सामान्य पेशी यात फरक करण्यास असमर्थ ठरत आहेत. शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्र अधिविभागातील




डॉ. शंकर हांगिरगेकर


डॉ. रुतीकेश गुरव


अक्षय गुरव

> यकृताच्या कर्करोगावरील उपचारांसाठी नावीन्यपूर्ण संशोधनास पेटंट प्राप्त झाल्याने शिवाजी विद्यापीठाच्या दर्जेदार व गुणवत्तापूर्ण संशोधनावर शिक्कामोर्तब झाले आहे. यापूर्वी डॉ. गजानन राशिनकर यांनी स्तनाच्या कर्करोगावरील उपचाराच्या अनुषंगाने केलेल्या संशोधनास पेटंट मिळाले आहे. जागतिक आरोग्य क्षेत्राच्या दृष्टीने ही संशोधने उपयुक्त आहेत. विद्यापीठातील अन्य संशोधकांनी समाजाभिमुख संशोधन प्रकल्प आवर्जून हाती घ्यावेत.
>
> **- डॉ. डी. टी. शिर्के,**
> कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

संशोधक डॉ. शंकर हांगिरगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. रुतीकेश गुरव व अक्षय गुरव यांनी बारा नवीन 'डायहैड्रोपिरिमिडोन्स' सेंद्रिय संयुगे प्रयोगशाळेमध्ये तयार केली. त्यांची चाचणी 'एच.ई.पी.जी.-२' या यकृताच्या कर्करोगाला कारणीभूत असणाऱ्या पेशींवर केली. ही संयुगे खूपच निवडकरीत्या कर्करोग पेशी नष्ट करतात, असे संशोधनातून आढळून आले. या संयुगांच्या निवडकतेच्या गुणधर्मामुळेच संशोधनास भारतीय पेटंट प्राप्त झाले आहे.

यकृताच्या कर्करोगावर इतर सर्वसामान्य पेशींना कोणताही अपाय न करता केवळ कर्करोगाच्या पेशींना लक्ष्य करणाऱ्या 'डायहैड्रोपिरिमिडोन्स' सेंद्रिय संयुगांची निर्मिती करण्यात यश आले आहे. ही संयुगे कर्करोगाच्या पेशींना पूर्णपणे नष्ट करतात. ते करीत असताना शरीरातील इतर सामान्य पेशींना अपाय करत नाहीत. त्यामुळे ही संयुगे कर्करुग्णांवर उपचारांसाठी सुरक्षित असल्याचे डॉ. हांगिरगेकर यांनी सांगितले.

27 FEB 2024
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# यकृताच्या कर्करोगावरील संशोधनासाठी पेटंट

## डॉ. शंकर हांगिरगेकर, रुतीकेश आणि अक्षय गुरव यांचे संशोधन

■ सकाळ वृत्तसेवा


अक्षय गुरव

कोल्हापूर, ता. २६ : यकृताच्या कर्करोगावरील उपचारप्रसंगी केवळ कर्करोगाच्याच पेशींना लक्ष्य करणाऱ्या अभिनव संशोधनासाठी शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातील संशोधकांना भारतीय पेटंट मिळाले आहे. डॉ. शंकर हांगिरगेकर यांच्यासह संशोधक विद्यार्थी डॉ. रुतीकेश गुरव, अक्षय गुरव यांनी हे संशोधन केले.

यकृताच्या कर्करोगावर इतर सर्वसामान्य पेशींना कोणताही अपाय न करता केवळ



डॉ. हांगिरगेकर : डॉ. गुरव

कर्करोगाच्याच पेशींना लक्ष्य करणाऱ्या 'डायहैड्रोपिरिमिडोन्स' या सेंद्रिय संयुगांची निर्मिती करण्यात यश प्राप्त झाले आहे. या संयुगाची कर्करोगाच्या पेशींवर यशस्वी चाचणीही घेण्यात आली. अहवालात असे आढळून आले की, ही संयुगे कर्करोगाच्या पेशींना पूर्णपणे नष्ट करतात. ते करताना शरीरातील इतर सामान्य पेशींना अपाय करत नाहीत. त्यामुळे ही संयुगे कर्करुग्णावर उपचारांसाठी सुरक्षित आहेत, असे डॉ. हांगिरगेकर यांनी सांगितले.

### दर्जेदार संशोधनावर पुनश्च शिक्कामोर्तब

'यकृताच्या कर्करोगावरील उपचारांसाठी अतिशय नावीन्यपूर्ण संशोधनास पेटंट प्राप्त झाल्याने शिवाजी विद्यापीठाच्या दर्जेदार व गुणवत्तापूर्ण संशोधनावर पुनश्च एकदा शिक्कामोर्तब झाले आहे. या संशोधनासाठी डॉ. हांगिरगेकर, संशोधक विद्यार्थ्यांचे अभिनंदन करतो. विद्यापीठातील अन्य संशोधकांनीही असे समाजाभिमुख संशोधन प्रकल्प आवर्जून हाती घ्यावेत', असे आवाहन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

यकृताचा कर्करोग स्त्रियांपेक्षा पुरुषांमध्ये अधिक प्रमाणात आढळतो. कर्करोगावरील केमोथेरपी उपचारांमध्ये काही औषधांचा उपयोग केला जातो, परंतु या औषधांचा इतर सामान्य पेशींवरही दुष्परिणाम होतो. सध्या वापरात असलेली कर्करोगावरील औषधे ही कर्करोगाच्या पेशी व इतर सामान्य पेशी यात फरक करण्यास असमर्थ ठरत आहेत. या पार्श्वभूमीवर डॉ. हांगिरगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ.रुतीकेश आणि अक्षय गुरव यांनी बारा नवीन 'डायहैड्रोपिरिमिडोन्स' सेंद्रिय संयुगे प्रयोगशाळेमध्ये तयार केली. त्यांची चाचणी 'एच.इ.पी. जी.-२' या यकृताच्या कर्करोगाला कारणीभूत असणाऱ्या पेशींवर केली. ही संयुगे खूपच निवडकरित्या कर्करोग पेशी नष्ट करतात, असे संशोधनांती आढळून आले. या संयुगांच्या निवडकतेच्या गुणधर्मामुळेच या संशोधनास भारतीय पेटंट मिळाले आहे.

27 FEB 2024 तरुण भारत
जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# यकृताच्या कर्करोगावरील संशोधनासाठी भारतीय पेटंट

## डॉ. शंकर हांगिरगेकर यांचे कर्करोगास कारणीभूत पेशींवर अभिनव संशोधन

प्रतिनिधी
कोल्हापूर

यकृताच्या कर्करोगावरील उपचारप्रसंगी केवळ कर्करोगाच्याच पेशींना लक्ष्य करणाऱ्या अभिनव संशोधनासाठी शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्र अधिविभागातील संशोधकांना भारतीय पेटंट मिळाले आहे. डॉ. शंकर हांगिरगेकर यांच्यासह संशोधक विद्यार्थी डॉ. रुतीकेश गुरव व अक्षय गुरव यांनी हे संशोधन केले.

यकृताच्या कर्करोगावर इतर सर्वसामान्य पेशींना कोणताही अपाय न करता केवळ कर्करोगाच्याच पेशींना लक्ष्य करणाऱ्या 'डायहैड्रोपिरिमिडोन्स' या सेंद्रिय संयुगांची निर्मिती करण्यात यश मिळाले आहे. या संयुगाची कर्करोगाच्या पेशींवर यशस्वी चाचणीही घेण्यात आली आहे. ही संयुगे कर्करोगाच्या पेशींना पूर्णपणे नष्ट करतात, हे या चाचणीच्या अहवालात आढळले आहे. हे करीत असताना शरीरातील इतर सामान्य पेशींना अपाय करत नाहीत. त्यामुळे ही संयुगे कर्करुग्णावर उपचारांसाठी सुरक्षित आहेत.

जगभरात आणि भारतातही यकृत कर्करोगाच्या रूग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. जागतिक स्तरावर यकृताचा कर्करोग स्त्रियांपेक्षा पुरुषांमध्ये अधिक आढळतो. यकृताच्या कर्करोगामुळे होणारा पुरुषांचा जागतिक मृत्युदर अधिक आहे. यकृताचा कर्करोग हा एक खूपच जटील असून, आतापर्यंत यकृत कर्करोगाच्या उपचारासाठी सर्जरी, केमोथेरपी, रेडीओथेरपी, अँटीबॉडीज् अशा विविध प्रकारच्या उपचार पद्धती विकसित करण्यात आल्या. परंतु या उपचार पद्धतींमध्ये रूग्णाला उपचारादरम्यानच्या दुष्परिणामांना (साईड इफेक्ट्स) सामोरे जावे लागते. कर्करोगावरील केमोथेरपी उपचारांमध्ये काही औषधांचा उपयोग केला जातो, परंतु या औषधांचा इतर सामान्य पेशींवरही दुष्परिणाम होतो. सध्या वापरात असलेली कर्करोगावरील औषधे ही कर्करोगाच्या पेशी व इतर सामान्य पेशी यात फरक करण्यास असमर्थ ठरत आहेत. संशोधक डॉ. शंकर हांगिरगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. रुतीकेश गुरव आणि अक्षय गुरव यांनी बारा नवीन 'डायहैड्रोपिरिमिडोन्स' सेंद्रिय संयुगे प्रयोगशाळेमध्ये तयार केली. त्यांची चाचणी 'एच.इ.पी.जी.-२' या यकृताच्या कर्करोगाला कारणीभूत असणाऱ्या पेशींवर केली. ही संयुगे खूपच निवडकरित्या कर्करोग पेशी नष्ट करतात, असे संशोधनांती आढळून आले. या संयुगांच्या सदर निवडकतेच्या गुणधर्मामुळेच या संशोधनास भारतीय पेटंट प्राप्त झाले आहे.


डॉ. शंकर हांगिरगेकर


डॉ. रुतीकेश गुरव


अक्षय गुरव

### विद्यापीठातील दर्जेदार संशोधनावर पुनश्च शिक्कामोर्तबः कुलगुरू डॉ. शिर्के

यकृताच्या कर्करोगावरील उपचारांसाठी अतिशय नाविन्यपूर्ण संशोधनास पेटंट प्राप्त झाल्याने विद्यापीठाच्या दर्जेदार व गुणवत्तापूर्ण संशोधनावर पुनश्च एकदा शिक्कामोर्तब झाले आहे. यापूर्वी डॉ. गजानन राशिनकर यांनीही स्तनांच्या कर्करोगावरील उपचाराच्या अनुषंगाने केलेल्या संशोधनासही पेटंट मिळाले आहे. जागतिक आरोग्य क्षेत्राच्या दृष्टीने ही संशोधने अत्यंत उपयुक्त आहेत. या संशोधनासाठी डॉ. हांगिरगेकर आणि त्यांचे संशोधक विद्यार्थी यांचे मनापासून अभिनंदन करतो. विद्यापीठातील अन्य संशोधकांनीही असे समाजाभिमुख संशोधन प्रकल्प आवर्जून हाती घ्यावेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 FEB 2024
लोकमत

# शिवाजी विद्यापीठास यकृताच्या कर्करोगवरील संशोधनाचे पेटंट

## डॉ. शंकर हांगिरगेकर यांचे संशोधन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : यकृताच्या कर्करोगावरील उपचारप्रसंगी केवळ कर्करोगाच्याच पेशींना लक्ष्य करणाऱ्या अभिनव संशोधनासाठी शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातील संशोधकांना भारतीय पेटंट मिळाले. डॉ. शंकर हांगिरगेकर यांच्यासह संशोधक विद्यार्थी डॉ. रुतीकेश गुरव व अक्षय गुरव यांनी हे संशोधन केले.



डॉ. शंकर हांगिरगेकर

यकृताच्या कर्करोगावर इतर सर्वसामान्य पेशींना कोणताही अपाय न करता केवळ कर्करोगाच्याच पेशींना लक्ष्य करणाऱ्या 'डायहैड्रोपिरिमिडोन्स' या सेंद्रिय संयुगांची निर्मिती करण्यात यश प्राप्त झाले. या संयुगाची कर्करोगाच्या पेशींवर यशस्वी चाचणीही घेण्यात आली. याच्या अहवालात ही संयुगे कर्करोगाच्या पेशींना पूर्णपणे नष्ट करतात. ते करीत असताना शरीरातील इतर सामान्य पेशींना अपाय करत नाहीत. त्यामुळे ही संयुगे कर्करुग्णावर उपचारांसाठी सुरक्षित असल्याचे आढळून आले. आतापर्यंत यकृत कर्करोगाच्या उपचारासाठी सर्जरी, केमोथेरपी, रेडिओथेरपी, अँटीबॉडीज अशा उपचार पद्धती विकसित करण्यात आल्या.



रुतीकेश गुरव



अक्षय गुरव

> यकृताच्या कर्करोगावरील उपचारांसाठी अतिशय नावीन्यपूर्ण संशोधनास पेटंट प्राप्त झाल्याने शिवाजी विद्यापीठाच्या दर्जेदार व गुणवत्तापूर्ण संशोधनावर पुनश्च एकदा शिक्कामोर्तब झाले आहे. - **डॉ. डी. टी. शिर्के,** कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ

परंतु, या उपचार पद्धतींमध्ये रुग्णाला उपचारादरम्यानच्या दुष्परिणामांना सामोरे जावे लागते. कर्करोगावरील केमोथेरपी उपचारांमध्ये काही औषधांचा उपयोग केला जातो, परंतु या औषधांचा इतर सामान्य पेशींवरही दुष्परिणाम होतो. या पार्श्वभूमीवर डॉ. रुतीकेश गुरव आणि अक्षय गुरव यांनी बारा नवीन 'डायहैड्रोपिरिमिडोन्स' सेंद्रिय संयुगे प्रयोगशाळेमध्ये तयार केली. त्यांची चाचणी 'एच.इ.पी.जी.-२' या यकृताच्या कर्करोगाला कारणीभूत असणाऱ्या पेशींवर केली. ही संयुगे निवडकरित्या कर्करोग पेशी नष्ट करतात, असे संशोधनांती आढळले. या संयुगांच्या सदर निवडकतेच्या गुणधर्मामुळेच या संशोधनास भारतीय पेटंट प्राप्त झाले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 FEB 2024
पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठामध्ये राष्ट्रीय विज्ञान सप्ताहाच्या उद्‌घाटनप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. एम. के. भानारकर आदी.

# स्टार्टअपमध्ये तंत्रज्ञानाचा वापर केल्यास देश विकसित होईल : कुलगुरू डॉ. शिर्के

कोल्हापूर : स्टार्टअपमध्ये जास्तीत जास्त भारतीय तंत्रज्ञान वापरल्यास देश विकसित होईल, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. शिवाजी विद्यापीठामध्ये राष्ट्रीय विज्ञान सप्ताहाच्या उद्‌घाटनप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. प्र-कुलगुरू प्रा. पी. एस. पाटील यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. उद्‌घाटन सत्राचे बीजभाषण प्रा. आर. एस. गाड यांनी केले. भौतिकशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स, गणितशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र अशा वेगवेगळ्या विषयांमध्ये भारतीय तंत्रज्ञान वापरून भारत विकसित होत आहे. यासाठी तरुणांनी पुढाकार घ्यावा, असे मत प्रा. गाड यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक समन्वयक डॉ. एम. के. भानारकर यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचे स्वागत प्रा. पी. के. गायकवाड यांनी केले. योगिता खबाले, स्वप्नाली पांगरे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. एस. एम. मस्के यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 FEB 2024
सकाळ

# विद्यापीठात राष्ट्रीय विज्ञान दिन उत्सवाला प्रारंभ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आजपासून शनिवार (ता. २) पर्यंत राष्ट्रीय विज्ञान दिन उत्सव साजरा केला जाणार आहे. त्याचा प्रारंभ कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. प्रा. आर. एस. गाड यांनी बीजभाषण केले. समन्वयक डॉ. एम. के. भानारकर यांनी प्रास्ताविक केले. प्रा. पी. के. गायकवाड यांनी स्वागत केले. कुलगुरु डॉ. शिर्के यांनी जास्तीत जास्त भारतीय तंत्रज्ञान वापरुन देश विकसित कसा होईल, या विषयावर विचार मांडले. प्र-कुलगुरु डॉ. पाटील यांनी रमन इफेक्टची मांडणी केली. प्रा. गाड यांनी आकाश निळे का दिसते आणि कशामुळे दिसते यावर भाष्य केले. यावेळी प्रा. एम. पी. भिलावे, प्रा. डेळेकर, प्रा. कदम, प्रा. शिंदे उपस्थित होते. योगिता खबाले, स्वप्नाली पांगरे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. एस. एम. मस्के यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 FEB 2024
लोकमत

# विद्यापीठात विज्ञान दिन उत्सवास प्रारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठामध्ये सोमवारपासून राष्ट्रीय विज्ञान दिन उत्सवास प्रारंभ झाला. कुलगुरू डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू प्रा. प्रमोद पाटील यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

कुलगुरू डॉ. शिर्के यांनी स्टार्टअप जास्तीत जास्त वापरून भारत विकसित कसा होईल यावर मार्गदर्शन केले. प्रा. आर. एस. गाड आयपीआर कक्षामार्फत भारतीय तंत्रज्ञान कसे विकसित होईल यासाठी प्रयत्न करावे. भौतिकशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स, गणितशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र अशा वेगवेगळ्या विषयांमध्ये भारतीय तंत्रज्ञान वापरून भारत विकसित होत आहे. यासाठी तरुणांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले.

यावेळी प्रा. एम. पी. भिलावे उपस्थित होते. योगिता खबाले व स्वप्नाली पांगरे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. एस. एम. मस्के यांनी आभार मानले. यावेळी विद्यार्थी उपस्थित होते. येत्या २ मार्चपर्यंत विज्ञान दिन उत्सव साजरा करण्यात येणार आहे.

जनसंपर्क कक्ष
27 FEB 2024 लोकसत्ता शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सार्वभौमत्व हे शिवस्वराज्याचे वैशिष्ट्य - डॉ. सुमित्रा कुलकर्णी

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी



**कोल्हापूर:** लोककल्याण आणि सहिष्णुता हा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्याचा पाया होता. तर सार्वभौमत्व हे महत्त्वाचे वैशिष्ट्य होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या माजी इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. सुमित्रा कुलकर्णी यांनी सोमवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागातर्फे ३५०व्या शिवस्वराज्य दिनाच्या निमित्ताने आयोजित छत्रपती शिवाजी महाराज व्याख्यानमालेअंतर्गत आज मराठा स्वराज्य निर्मिती: एक अवलोकन या विषयावरील व्याख्यानात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते, तर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे प्रमुख उपस्थित होते.

डॉ. कुलकर्णी पुढे म्हणाल्या, स्वराज्यामध्ये राजकीय प्रक्रिया ही कायद्याची बाब म्हणून समोर येत असली तरी त्यामध्ये अंतर्भूत सामाजिक-सांस्कृतिक प्रक्रिया आणि आकलन होणाऱ्या मानसिक प्रक्रिया या स्वराज्यनिर्मितीसाठी परस्परपूरक भूमिका बजावतात. यामुळे महाराष्ट्रातील सर्व भूमीपुत्रांसाठी उदयाला आलेले राज्य म्हणून स्वराज्याकडे पाहायला हवे.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, या भूमीवर छत्रपती शिवाजी महाराजांनी घडविलेल्या राजकीय, सामाजिक-सांस्कृतिक आणि मानसिक अभिसरणातून येथील लोकांचे जीवनमान, राहणीमान यांमध्ये मोठ्या प्रमाणात बदल होऊ शकला. स्वराज्यप्रेरणेतून त्यांच्या मनी स्वाभिमान जागृत झाला.

इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी प्रास्ताविक, सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन, तर डॉ. नीलांबरी जगताप यांनी आभार मानले.

2 7 FEB 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लोककल्याण, सहिष्णुता हा स्वराज्याचा पाया

## डॉ. सुमित्रा कुलकर्णी; शिवाजी विद्यापीठात इतिहास विभागाची व्याख्यानमाला


डॉ. कुलकर्णी

कोल्हापूर, ता. २६ : 'लोककल्याण आणि सहिष्णुता हा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्याचा पाया होता, तर सार्वभौमत्व हे महत्त्वाचे वैशिष्ट्य होते. शिवराज्याभिषेक ही शिवाजी महाराजांनी आरंभलेल्या स्वराज्य निर्मितीच्या चळवळीची उच्चतम अवस्था आहे. त्याद्वारे पारंपरिक राज्यपदाच्या पलिकडे महाराजांनी आपल्या राजपदाच्या कक्षा व्यापक केल्या. या व्याप्तीनेच ते 'लोकनायक राजा' ठरले', असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ डॉ. सुमित्रा कुलकर्णी यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागातर्फे ३५० व्या शिवराज्याभिषेक दिनाच्या निमित्ताने आयोजित छत्रपती शिवाजी महाराज व्याख्यानमालेअंतर्गत आज 'मराठा स्वराज्य निर्मिती: एक अवलोकन' या विषयावरील व्याख्यानात त्या बोलत होत्या. डॉ. कुलकर्णी म्हणाल्या, 'छत्रपतींच्या आज्ञापत्रांतून राज्य, स्वराज्य, महाराष्ट्रभूमी अशा शब्दांनी स्वराज्याचे वर्णन दिसून येते. राज्याच्या संकल्पनेमध्ये लोकसंख्या, विशिष्ट लोकसमूहांचा भूप्रदेश, शासनसंस्थेचे लोकाभिमुख स्वरुप आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे सार्वभौम हक्क यांचा समावेश होतो.'

**पुस्तिका प्रकाशित करणार**

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'स्वराज्यनिर्मितीची प्रक्रिया ही महाराष्ट्राच्या इतिहासातील, लोकजीवनातील फार महत्त्वाची प्रक्रिया आहे. डॉ. कुलकर्णी यांची शास्त्रीय, अभ्यासपूर्ण मांडणी प्रत्येक घटकासाठी महत्त्वाची आहे. त्यामुळे या व्याख्यानाची पुस्तिका विद्यापीठाच्या छत्रपती शिवाजी महाराज अभ्यास केंद्रातर्फे प्रकाशित करण्यात येईल.'

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

27 FEB 2024 पुढारी

# लोककल्याण, सहिष्णुता स्वराज्याचा पाया

## डॉ. सुमित्रा कुलकर्णी; इतिहास विभागातर्फे विशेष व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

लोककल्याण व सहिष्णुता हा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्याचा पाया होता, तर सार्वभौमत्व हे महत्त्वाचे वैशिष्ट्य होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ तथा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या माजी इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. सुमित्रा कुलकर्णी यांनी केले.



**कोल्हापूर : व्याख्यानात बोलताना ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ डॉ. सुमित्रा कुलकर्णी. सोबत डॉ. अवनिश पाटील, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. नीलांबरी जगताप.**

शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागातर्फे ३५० व्या शिवस्वराज्य दिनाच्या निमित्ताने आयोजित छत्रपती शिवाजी महाराज व्याख्यानमालेंतर्गत सोमवारी 'मराठा स्वराज्य निर्मिती : एक अवलोकन' या विषयावरील व्याख्यानात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते, तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे प्रमुख उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, डॉ. कुलकर्णी यांची शास्त्रीय व अभ्यासपूर्ण मांडणी प्रत्येक घटकासाठी महत्त्वाची आहे. इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनिश पाटील यांनी प्रास्ताविक केले. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. नीलांबरी जगताप यांनी आभार मानले.

27 FEB 2024
सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांनी बदलांना सामोरे जावे

## डॉ. अनिल गोरे; विद्यापीठात संख्याशास्त्र परिसंवाद

कोल्हापूर, ता. २६ : 'संख्याशास्त्राच्या विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रांमध्ये करिअर व सेवेच्या अनेक संधी आहेत. जगाची दारे संख्याशास्त्राच्या विद्यार्थ्यांसाठी उघडी आहेत, मात्र त्यासाठी नवनवीन बदलांना विद्यार्थ्यांनी सामोरे गेले पाहिजे', असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागाचे निवृत्त प्रमुख डॉ. अनिल गोरे यांनी आज येथे केले. शिवाजी विद्यापीठाचा संख्याशास्त्र अधिविभाग आणि विद्यापीठ संख्याशास्त्र शिक्षक संघटना यांच्यातर्फे राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त आयोजित परिसंवादात ते बोलत होते. 'दैनंदिन जीवनातील वास्तविक समस्यांचे सांख्यिकीय अन्वेषण' असा परिसंवादाचा विषय आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, तर पुण्याच्या मेट्रिक कन्सल्टन्सीचे संस्थापक-अध्यक्ष डॉ. आनंद करंदीकर, ज्येष्ठ संख्याशास्त्रज्ञ डॉ. रंगनाथ रटिहळ्ळी प्रमुख उपस्थित होते. संख्याशास्त्र अधिविभाग प्रमुख शशीभूषण महाडिक यांनी प्रास्ताविक केले. सोमनाथ पवार यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. सुकुमार राजगुरु यांनी आभार मानले.




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित संख्याशास्त्र परिसंवादामध्ये मार्गदर्शन करताना डॉ. अनिल गोरे. यावेळी डावीकडून डॉ. सोमनाथ पवार, आनंद करंदीकर, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, रंगनाथ रटिहळ्ळी, शशिभूषण महाडिक.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 7 FEB 2024
पुढारी


# विद्यापीठात आजपासून सामाजिक वंचितता विभागातर्फे राष्ट्रीय परिषद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्राच्या वतीने मंगळवार (दि. २७) पासून 'अमृतकाळ आणि भारतातील आदिवासींचे समावेशन' या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे मानव्यशास्त्र सभागृहामध्ये आयोजन करण्यात आले आहे. परिषदेचे उद्घाटन प्रा. सोनझारिया मिंज यांच्या बीजभाषणाने होणार आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. डी. टी. शिर्के असणार आहेत. परिषदेत देशभरातील संशोधक व अभ्यासक आदिवासी समाज आणि सामाजिक वंचितता, वंचिततेचे शास्त्रीयदृष्ट्या मोजमाप, आदिवासींच्या समावेशनासाठी करण्यात आलेल्या संविधानात्मक तरतुदी आणि कायदे याविषयी मांडणी करणार आहेत. परिषदेचा समारोप प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थितीत होईल. राष्ट्रीय परिषदेस उपस्थित रहावे असे आवाहन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, अभ्यास केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 7 FEB 2024
पुढारी

# गाण्याचा अभ्यास करताना त्यातील भाव समजून घ्या : पं. राजा काळे

कोल्हापूर : संगीत केवळ परीक्षेसाठी न शिकता अंतर्मुखतेने संगीताचा



कार्यशाळेमध्ये बोलताना गायक पं. राजा काळे.

अभ्यास करा. स्वरसाधना भक्तिपूर्वक झाली पाहिजे. गाण्याचा अभ्यास करताना त्यातील भाव समजून घेण्यासाठी गाण्याचे काव्य व स्वरलगाव यांचा अभ्यास आवश्यक आहे. ही सांगीतिक साक्षरता संगीताच्या शिक्षणात आवश्यक आहे, असे प्रतिपादन प्रख्यात गायक पं. राजा काळे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागातर्फे आयोजित 'सूर-चैतन्य साधना' कार्यशाळेमध्ये ते बोलत होते. पं. काळे म्हणाले, संगीत आत्म्याची भाषा असल्याने सूर, गाणे हे आत्म्याला भिडणारे असले पाहिजे. संगीत शिकताना केवळ संगीताचे व्याकरण न शिकता संगीताचा काव्यात्मक व सौंदर्यात्मक दृष्टीने विचार केला पाहिजे. केवळ रागगायन न करता त्या रागाची धून बनली पाहिजे. परीक्षेसाठी गाणे न शिकता गाण्यासाठी गाणे शिका. याप्रसंगी पं. राजा काळे यांचे शिष्य श्याम जोशी यांनी स्वरसाथ केली. प्रशांत देसाई यांनी तबलासाथ केली. कोल्हापुरातील ज्येष्ठ गायक पं. विनोद डिग्रजकर यांच्या हस्ते पं. काळे यांचा सत्कार करण्यात आला. विभागप्रमुख डॉ. विनोद ठाकूर-देसाई यांनी प्रास्ताविक केले. अतुल परीट यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 FEB 2024
लोकमत


# संगीत शिक्षणात सांगीतिक साक्षरता आवश्यक : काळे

कोल्हापूर : गाण्याचा अभ्यास करताना त्यातील भाव समजून घेण्यासाठी गाण्याचे काव्य आणि स्वरलगाव यांचा अभ्यास आवश्यक आहे. ही सांगीतिक साक्षरता संगीताच्या शिक्षणात अतिशय आवश्यक आहे, असे प्रतिपादन प्रख्यात गायक पं. राजा काळे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित 'सूर - चैतन्य साधना' या कार्यशाळेमध्ये ते बोलत होते. यावेळी काळे यांनी शास्त्रीय संगीताच्या शिक्षणाचे मर्म सुगमतेने उलगडून दाखवले. राजा काळे यांचे शिष्य श्याम जोशी यांनी स्वरसाथ केली. प्रशांत देसाई यांनी तबलासाथ केली.

पं. विनोद डिग्रजकर यांच्या हस्ते राजा काळे यांचा शाल, स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. विभागप्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी प्रास्ताविक केले. अतुल परीट यांनी परिचय करून दिला

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 FEB 2024
सकाळ



**कोल्हापूर :** मराठी राजभाषा दिनाच्या पूर्वसंध्येला सोमवारी शिवाजी विद्यापीठात 'लिअर' हा दीर्घांक रंगला.

# शिवाजी विद्यापीठात रंगला 'लिअर' दीर्घांक

कोल्हापूर, ता. २६ : शिवाजी विद्यापीठ मराठी विभाग, विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने मराठी राजभाषा दिनाच्या पूर्वसंध्येला जयंत पवार लिखित 'लिअर' हा दीर्घांक रंगला. संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले. शिवाजी विद्यापीठाच्या वि.स. खांडेकर भाषा भवनात हा प्रयोग झाला.

'लिअर' ही प्रसिद्ध नाटककार जयंत पवार यांची अत्यंत महत्त्वाची एकांकिका-दीर्घांक. या दीर्घांकाच्या केंद्रस्थानी एका नामांकित नाट्य प्रशिक्षण संस्थेतील प्रमुख दिग्दर्शक आणि एका यशस्वी कलावंताची शोकांतिका मांडली आहे. ज्या पद्धतीने राजा लिअरची शोकांतिका केवळ अहंकार गोंजारल्यामुळे होते. त्याच पद्धतीने विप्लव मुजुमदार या दिग्दर्शक-कलावंताची शोकांतिका समांतर पद्धतीने या दीर्घांकाच्या केंद्रस्थानी आहे. सर्वच बाजूंनी हा प्रयोग सफाईदार झाला. दिव्या गावस, ऋतुजा बडवे, युवराज केळूस्कर, अजय फोंडेकर, शिरीष विचारे आदींच्या भूमिका होत्या. संगीत व नाट्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई निर्मितीप्रमुख तर प्रशांत नागावकर यांचे दिग्दर्शन होते. सिद्रा उटगी (नेपथ्य), सिध्दांत खांडेकर (पार्श्वसंगीत), प्रवेश तारी (प्रकाश योजना), श्रवण नाईक (रंगभूषा), आसावरी कुलकर्णी (वेशभूषा) यांच्यासह संपदा गावस, संजना परब यांनी रंगमंच व्यवस्था केली. लेखक व दिग्दर्शक विद्यासागर अध्यापक, संजय तोडकर, किरणसिंह चव्हाण आदी यावेळी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

2 7 FEB 2024
पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील भुयारी मार्गाचे काम वेगाने सुरू आहे. (छाया : अर्जुन टाकळकर)

# विद्यापीठातील भुयारी मार्गाला गती

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या दोन भागांना जोडणाऱ्या भुयारी मार्गाला गती आली आहे. वर्षभरात हा मार्ग पूर्ण करण्याचे नियोजन आहे. त्यादृष्टीने या कामाचा वेग वाढवण्यात आला आहे. याकरिता रस्त्यावरील एका बाजूची वाहतूक बंद करण्यात आली आहे.

शिवाजी विद्यापीठासमोरील जुन्या पुणे-बंगळूर महामार्गावरील वर्दळ वाढली आहे. यामुळे शिवाजी विद्यापीठाच्या पूर्वेकडील भागात ये-जा करण्यासाठी भुयारी मार्ग उभारला जात आहे. शहरातील वरून आणि खालून वाहने जाणारा पहिलाच भुयारी मार्ग आहे.

या मार्गाचे काम २५ दिवसांपूर्वी सुरू झाले आहे. गेल्या चार दिवसांपासून मुख्य रस्त्यावर भुयारासाठी खोदकाम सुरू करण्यात आले. याकरिता पोस्ट ऑफिस चौकातून विद्यापीठाकडे जाणारा मार्ग वाहतुकीसाठी बंद केला आहे. विद्यापीठ-पोस्ट कार्यालय या मार्गावर दुहेरी वाहतूक सुरू करण्यात आली आहे. सुमारे तीन ते चार महिने या मार्गावर दुहेरी वाहतूक सुरू राहिली. पहिल्या टप्प्यात एका बाजूचा भुयारी मार्ग पूर्ण केला जाईल, त्यानंतर दुसऱ्या बाजूला खोदकाम केले जाणार आहे.

27 FEB 2024

सकाळ


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रत्येक 'सेमिस्टर' चा अर्ज भरा, अन्यथा वर्ष वाया

## शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा मंडळाचा निर्णय; वर्गातील उपस्थितीची होणार खातरजमा

■ संतोष मिठारी : सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २६ : पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या प्रत्येक सत्राचा (सेमिस्टर) परीक्षा अर्ज भरणे आवश्यक आहे. त्यांनी अर्ज भरला नाही, तर त्यांना पुढील सत्राची परीक्षा देता येणार नाही. त्यामुळे त्यांचे वर्ष वाया जाणार आहे. वर्गातील ७५ टक्के उपस्थितीच्या निकषाचे पालन, अंतर्गत गुण विद्यापीठाच्या प्रणालीत समाविष्ट करणे, आदींच्या दृष्टीने परीक्षा व मूल्यमापन मंडळाने अर्ज भरणे बंधनकारक करण्याचा निर्णय घेतला आहे.



काही कारणास्तव विद्यार्थ्यांना पहिल्या सत्रात परीक्षा अर्ज भरता आला नाही, तर त्यांना दुसऱ्या सत्रात त्या आणि पहिल्या सत्रातील विषय घेऊन परीक्षा देण्यासाठी अर्ज भरता येत होता. मात्र, त्यावर संबंधित विद्यार्थ्यांची वर्गातील ७५ टक्के हजेरी, अंतर्गत मूल्यमापन याबाबत काही घटकांनी आक्षेप नोंदविला. त्यामुळे परीक्षा मंडळाने आता विद्यापीठ कायद्यातील परिनियमांनुसार विद्यार्थ्यांना प्रत्येक सत्रात परीक्षा अर्ज भरणे बंधनकारक केले आहे. त्याची अंमलबजावणी नव्या सत्रापासून केली जाणार आहे.

### आता अखेरची संधी

पूर्वी पहिल्या आणि दुसऱ्या सत्राचा परीक्षा अर्ज एकदम विद्यार्थ्यांना भरता येत होता. मात्र, आता उन्हाळी सत्रात परीक्षा मंडळाने पूर्वीची प्रक्रिया बंद केली. त्यामुळे अशा विद्यार्थ्यांना अर्ज भरता येईनात. त्यांनी याबाबत महाविद्यालय आणि परीक्षा मंडळाकडे पाठपुरावा केला. त्याची दखल घेत पूर्वीप्रमाणे प्रक्रिया विद्यापीठाने सुरु करण्यास मान्यता दिली. त्यानुसार ऑनलाईन प्रणाली तांत्रिक सुधारणा करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना पूर्वीप्रमाणे अर्ज भरता येत आहेत. मात्र, विद्यार्थ्यांना या सत्रापुरती आणि अखेरची संधी राहणार आहे.

### आकडेवारी दृष्टिक्षेपात

- परीक्षेची सत्रे (उन्हाळी, हिवाळी) : २
- परीक्षांची एकूण संख्या : १४००
- विद्यार्थ्यांची संख्या : २ लाख ५० हजार

### प्राचार्यांना द्यावे लागणार प्रमाणपत्र

■ ज्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये सत्र एक, तीन, पाचसाठी अर्ज भरले नाहीत. अशा विद्यार्थ्यांचे अर्ज उन्हाळी सत्र मार्च-एप्रिल २०२४ साठी एक-दोन, तीन-चार, पाच-सहाच्या परीक्षेसाठी भरण्यास हजेरी, सत्रकर्म पूर्ण करण्याबाबतच्या अटींवर केवळ उन्हाळी सत्रासाठी मान्यता दिली असल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी सांगितले. अर्ज भरणाऱ्या विद्यार्थ्यांच्या उपस्थितीचे आणि सत्रकर्म पूर्ण केल्याची खातरजमा करून त्याबाबतचे प्रमाणपत्र प्राचार्यांनी द्यावयाचे आहे. पुढील शैक्षणिक वर्षात अशा प्रकारची बाब उद्‌भवणार नाही याची दक्षता महाविद्यालयांनी घ्यावी, अशी सूचना केली असल्याचे त्यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 FEB 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठाकडून विविध निकाल जाहीर

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर ६४८ अभ्यासक्रमांचे निकाल आजअखेर घोषित करण्यात आले आहेत.

विद्यापीठ हिवाळी सत्र अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरू आहेत. दि. २४ रोजी एम.फार्मा, विधी (तीन व पाच वर्ष) अभ्यासक्रमांच्या विविध सत्रांच्या १३ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले. विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनांप्रमाणे परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 FEB 2024
सकाळ




कोल्हापूर : सुदेष्णा शिवणकरने १०० मीटर धावणे स्पर्धेत सुवर्ण पदकाची कमाई केली. शेजारी प्रा. आर. टी. पाटील, प्रा. सविता भोसले, डॉ. इब्राहीम मुल्ला.

# सुदेष्णा शिवणकरला खेलो इंडियात 'सुवर्ण'

कोल्हापूर, ता. २६ : गुवाहाटी येथे सुरू असलेल्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाची खेळाडू सुदेष्णा हणमंत शिवणकर (सातारा) हिने १०० मीटर धावणे स्पर्धेत १२.०१ सेकंदाची वेळ नोंदवत सुवर्ण पदकाची कमाई केली.

यंदाच्या स्पर्धेत इतकी वेगवान वेळ नोंदविली. सुदेष्णाने यापूर्वी दोन अखिल भारतीय विद्यापीठ स्पर्धेत सुवर्णपदक मिळवले होते, तर मागील वर्षी या स्पर्धेत तिला रौप्य पदकावर समाधान मानावे लागले होते.

यंदा तिने वेगवान वेळ नोंदवत पदकावर शिक्कामोर्तब केला. तिला प्रशिक्षक प्रा. आर. टी. पाटील, डॉ. इब्राहीम मुल्ला, डॉ. सविता भोसले यांचे मार्गदर्शन लाभले.